निर्मिती : माऊली प्रॉडक्शन
लेखक/ दिग्दर्शक/ नेपथ्य/ संगीत : पुरुषोत्तम बेर्डे
प्रकाश योजना : शीतल तळपदे
कलावंत : दीपक करंजीकर, प्रदीप प्रधान, राजेश कांबळे, महेंद्र तेरेदेसाई, महेश जोशी, दीपा चापेकर, दीपश्री देवधर, चैतन्य चंद्रात्रे, राजेश पाठक, प्रमोद विचारे, विजय गुडेकर, संदीप शिगवण, विजय सानप, दत्ताजी शिंदे, प्रियांक बोरकर.
दर्जा : * *१/२

महाराष्ट्र टाइम्स
मुंबई • १३ मार्च २०१०

जयंत पवार
jayant.pawar@timesgroup.com



# विषय चांगला, पण नेम चुकला!

## चौथी भिंत

### गांधी विरुद्ध सावरकर

एक प्रामाणिक सरकारी अधिकारी आपले निर्णय लोकहितार्थ निष्ठुरपणे राबवत असताना सत्तेत असणाऱ्या आणि सत्ताधाऱ्यांशी लागेबांधे असणाऱ्या धेंडांचे हीतसंबंध दुखावले जातात आणि त्या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याच्या कारभाराची चौकशी करण्यासाठी समिती बसवली जाते. ती समिती बसवतानाच अहवालात अधिकाऱ्यावर ठपका ठेऊन त्याला बडतर्फ वा निलंबित करण्याचा निर्णय झालेला आहे, मात्र त्या निर्णयापर्यंत कसं कसं यायचं यात समितीतल्या सदस्यांची कसोटी लागणार आहे आणि त्यांनी लावलेले प्रत्येक सापळे उद्ध्वस्त करणं हे सरकारी अधिकाऱ्यापुढचं आव्हान ठरणार आहे.

'गांधी विरुद्ध सावरकर' या नाटकातला संघर्ष हा आहे, किंबहुना असायला हवा, असं संपूर्ण नाटक पाहिल्यावर वाटतं. मात्र नाटकाचे लेखक-दिग्दर्शक पुरुषोत्तम बेर्डे यांनी नाटकाचा नायक पर्यावरणतज्ज्ञ दाखवून पर्यावरण हाच नाटकाचा केंद्रवर्ती विषय मानला आहे. व्यावसायिक रंगभूमीच्या चौकटीत विचार करू जाता पर्यावरण हा या नाटकाचा यूएसपी आहे, असं त्यांना वाटणं साहजिक आहे. गेल्या काही वर्षांत व्यावसायिक स्तरावर येणाऱ्या नाटकांचे विषय पाहता 'गांधी विरुद्ध सावरकर' मधला विषय आज नक्कीच नाविन्यपूर्ण वाटू शकतो. ग्लोबल वॉर्मिंगमुळे तो आज जीवनमरणाचा झाला आहे. पण तो (व्यावसायिक नाटकांचा प्रेक्षक असलेल्या) सुशिक्षित मध्यमवर्गासाठी नवा मात्र नाही. प्रसारमाध्यमांतून तो त्याच्यावर येऊन आदळत असतोच पण सरकारी यंत्रणा, एनजीओ, पर्यावरणवाद्यांची आंदोलनं, जागतिक परिषदा यांमुळेही त्याचं गांभीर्य त्याला कळून चुकलेलं आहे. तो त्याच्यासमोर अलिकडच्या नाटक-सिनेमातून मात्र आलेला नाही. (सत्तरच्या दशकात आयएनटीने शंभू मित्रा दिग्दर्शित 'कोंडी' हे मराठी नाटक सादर केलं होतं, जे इब्सेनच्या 'एनिमी ऑफ द पिपल'चं रुपांतर होतं आणि त्याचा विषय प्रदूषणाच्या विरोधात एकाकी झुंज देणारा डॉक्टर हाच होता.) त्यामुळे 'गांधी वि. सावरकर'च्या विषयाचं लेखकाला अभिप्रेत असलेलं नाविन्य मर्यादित अर्थानेच घ्यायला हवं. शेवटी

पूरक ठरणाऱ्या जोड कथानकासारखे आलेले आहेत. उदा. रामराव कोलते पाटलांनी सावरकरांच्या ऑफिसमध्ये येऊन दमदाटी करणं, सावरकरांनी उद्योगपती घनश्याम पटेल यांना आपला मुद्दा प्रभावीपणे समजावून देणं, पाटलांचा मुलगा आणि पटेलांची मुलगी यांचं प्रेमप्रकरण, त्यातून पाटलांच्या मुलाने सावरकरांना केलेला विरोध आणि पटेलांची मुलगी नेहा हिने घेतलेली बाजू, नेहाने प्रदूषणविरोधी लढ्यात उतरणं, शेवटी मेघन पाटीलला तिची बाजू पटणं वगैरे. यातल्या कुठल्याही प्रसंगात अटीतटीचं नाट्य नाही किंवा जे आहे ते ओळखीचं आहे. प्रदूषणाचा शिरढोण गावच्या लोकांवर झालेला भयानक परिणाम केवळ वर्णनातून येतो. उलट गावकऱ्यांच्या आंदोलनासारखा रंगमंचावर दाखवायला अवघड असा चुकीचा प्रसंग बेर्डे परिणाम साधण्यासाठी निवडतात. त्यामुळे होतं असं की जो नाटकाचा मुख्य विषय नाही त्यावर अधिक शक्ती वाया गेल्याने चौकशी नाट्यातल्या ताण निर्माण करणाऱ्या अस्पर्शी पैलूंकडे बेर्डेंचं लक्षच गेलेलं नाही. चौकशी करणाऱ्या गांधी कमिशनमधले सगळे सदस्य शासन, प्रशासन आणि सत्ताधारी पक्षाशी संबंधित आहेत. एकटे गांधी हे सरकारीपणाचा वास नसलेले निवृत्त न्यायमूर्ती आहेत. पण ते कणाहीन आहेत. त्यांना स्वतःची अशी भूमिकाच नाही. त्यामुळे ते सावरकरांशी तात्त्विक वाद घालून त्यांना कोंडीत पकडू शकत नाहीत. इतरांचे वाद हे केवळ क्षुद्र व्यावहारिक पातळीवरचे आहेत, त्यामुळे सावरकर त्यांचा सहज

असता तर पर्यावरणवाद्यानाहा कोणत्या तात्त्विक मुद्यांवरून विरोध होत असतो, हे लक्षात आलं असतं. आणि जर गांधी सशक्त झाले असते तर सावरकरांच्या व्यक्तिरेखेला अधिक बळकटी आली असती. सावरकर हे सरकारी अधिकारी आणि पती अशा दोन्ही पातळ्यांवर आदर्श म्हणून उभे राहतात, त्यामुळेही संघर्ष उभा राहायला मर्यादा येतात. सावरकरांच्या पत्नीलाही नवऱ्याची सावली यापलिकडे स्वतःचा चेहरा नाही.

नाटकाच्या शीर्षकातून गांधी आणि सावरकरांचा संघर्ष सूचित करण्याची चाल ही केवळ नाटकाला आकर्षक कॅचलाईन मिळावी एवढ्याच मर्यादित उद्देशाने केली असेल असं वाटत नाही. सत्ताधारी पक्ष (काँग्रेस) आणि त्याचं शासन सावरकरांवर कमिशन बसवतं. हा पक्ष गांधींचं नाव पदोपदी वापरतो म्हणून नाटकाच्या शीर्षकात गांधींचा उल्लेख आहे, असा एक अजब युक्तिवाद करण्यात आलेला आहे. गांधी हे नाव नसून प्रवृत्ती असेल तर चुकीच्या गोष्टीची ओळख म्हणून त्याचं ब्रॅण्डिंग करणं हे आक्षेपार्ह आहे. उलट उपरोक्त युक्तिवाद खोडायचा तर असं म्हणता येईल की, गेल्यावर्षी पार पडलेल्या कोपनहेगन परिषदेत कार्बन उत्सर्जन रोखण्याच्या मुद्यावर अमेरिकेने केलेली अरेरावी ही नाटकातल्या चौकशीसमिती सारखी आहे आणि अमेरिका काही गांधींचं नाव वापरत नाही. मग नाटकातला संघर्ष जागतिक स्तरावर लावून बघायचा झाला तर हे शीर्षक अन्वर्थक ठरेल का? असो.

नाटकाचा प्रयोग मात्र रेखीव होतो. त्यातला बराचसा भाग माहितीप्रधान असूनही तो सुसह्य होण्याजोगा पेश होतो. दीपक करंजीकर हे डॉ. दिनेश सावरकरांची